# नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाईंड (नॅब) चिपळूण जिल्हा शाखा रत्नागिरी

SERVE THE BLIND

तमसो मा ज्योतिर्गमय

## संचलित

## नॅब आय हॉस्पिटल, चिपळूण व बाई रतन बाई घरडा अंध पुनर्वसन केंद्र

रजि. क्र. एफ / १२६५ / रत्ना.

नॅब भवन, डी.बी.जे. कॉलेज समोर, परशुराम नगर, चिपळूण.
☎ 7796521135
Website : www.nabchiplun.org
email : nabeyehospitalcpn@gmail.com

# वार्षिक अहवाल

## सन २०२२ - २०२३



नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड नॅब चिपळूण
जिल्हा शाखा रत्नागिरी आयोजित
स्वयंसिध्दता कार्यशाळेतील ही काही क्षणचित्रे



सेंच्युरिऑन सिल्वर फेको मशिन

# मनोगत

आपल्या नॅब चिपळूण जिल्हा शाखा रत्नागिरी याचा सन २०२२-२३ चा वार्षिक अहवाल सादर करताना अपार आनंद होत आहे. नॅब चिपळूण जिल्हा शाखा रत्नागिरीने संस्थेच्या ध्येय धोरणानुसार वाटचाल चालू ठेवली आहे.
नॅब जिल्हा शाखेतर्फे बाई रतन बाई घरडा पुनर्वसन केंद्र मार्फत जिल्ह्यातील अंध नोंदणी, एस. टी. व रेल्वे पास असे शासनाचे लाभ मिळवून देण्यात नियमीत सहकार्य केले आहे. शासनाच्या समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात आलेल्या अपंगांच्या योजनांचा लाभ, स्वयंरोजगांर योजने अंतर्गत पुनर्वसनासाठी विशेष बाब म्हणून बाई रतनबाई घरडा अंध पुनर्वसन केंद्रामार्फत दृष्टीबाधीत बांधवांना प्रतिवर्षी मुंबई, अंबरनाथ येथे प्रशिक्षण, शैक्षणिक साहित्य वाटप केले जाते.

अहवाल वर्षात नॅब आय हॉस्पिटलमध्ये २९,६५३ बाह्यरूग्णांची तपासणी करण्यात आली. शृंगारतळी ता. गुहागर येथे ''दृष्टी आय केअर'' यांच्या सहकार्याने त्यांच्या दुकानात आपले नेत्रतज्ञ दर रविवारी नेत्रतपासणी करतात. सदर केंद्रामध्ये अहवाल वर्षात ९२५ रूग्ण तपासण्यात आले. अहवाल वर्षामध्ये आपल्या हॉस्पिटल मध्ये ४९६७ शस्त्रक्रिया यशस्विरित्या करण्यात आल्या. हा नविन उच्चांक आहे. एकूण ९४ नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीरांमधून २२१३ रूग्णांच्या मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

अहवाल वर्षात आपण अल्कॉन लॅबोरेटरीज इंडीया प्रा. लि. चे सेंच्युरिऑन सिल्व्हर हे नविन फेको मशिन कार्यान्वीत केले आहे.

सदर अहवाल वर्षात सर्व कार्यकरणी सभासद व इतर सभासद यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल सर्वांना धन्यवाद !

अहवाल वर्षामध्ये आपण उच्चांकी शस्त्रक्रिया व बाह्य रूग्ण तपासणी साध्य केली यामध्ये सर्व वैद्यकिय अधिकारी तसेच सर्व कर्मचारी यांचा मोठा वाटा आहे. यासाठी संस्था वैद्यकिय अधिकारी व सर्व कर्मचारी वर्गाचे आभार मानून धन्यवाद देत आहे.

अहवाल वर्षात आपल्या संस्थेस ९९१ मोफत शस्त्रक्रिया अनुदान रू. १४.०६ लाख मिळाले आहे व आपल्या स्वनिधि मधुन १२२२ मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या. सदर शस्त्रक्रियांसाठी रू. १३.७७ लाख स्वनिधी मधून खर्च करण्यात आले. आर्थिक वर्ष २०१७-१८ पासून शासकिय अनुदान कमी झाले असून संस्थेने केलेल्या ८३४२ मोफत शस्त्रक्रियांपैकी फक्त २३२७ रूग्णांचे अनुदान प्राप्त झाले आहे. संस्थेने उरलेल्या मोफत शस्त्रक्रियांसाठी स्वनिधी मधून अंदाजे रू. १०५ लाख इतका खर्च केला आहे.

मागील ३ वर्षाप्रमाणे संस्थेने १००० मोफत शस्त्रक्रिया करण्याचे ठरविले आहे. सदर शस्त्रक्रियांना खर्च पाहता सर्व सभासदांना विनंती करण्यात येत आहे की, आपण सर्वोतोपरी सहकार्य करावे. वरील उद्दिष्ट राबविताना संस्थेला आर्थिक भाग उचलावा लागत आहे. तरी वरील आवाहना नुसार तन मन धनाने सर्वोतोपरी सहकार्याची अपेक्षा...



**श्री. सुचय नथुराम रेडीज**
**अध्यक्ष**



**श्री. निलेश आत्माराम भुरण**
**कार्यवाह**

# राष्ट्रीय अंध कल्याण संघ (नॅब) चिपळूण जिल्हा शाखा रत्नागिरी
# कार्यकारणी सदस्यांची नावे, पद व दूरध्वनी क्रमांक याबाबतचा तपशील
# सन २०२० ते २०२५

| नाव | पद | दुरध्वनी क्र/ भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| श्री. सुचय नथुराम रेडीज | अध्यक्ष | ९४२२४३०१६३ |
| श्री. इब्राहीम अहमद दलवाई | उपाध्यक्ष | ९८२२१५४६६१ |
| सौ. सुचेता नारायण लाड | उपाध्यक्षा | ९४२१८९२६८० |
| श्री. निलेश आत्माराम भुरण | कार्यवाह | ७०३०९९३३७७ |
| श्री. सलिम कासिम पालोजी | सहकार्यवाह | ९८२२१५५३६० |
| श्री. नयन मनोहर साडविलकर | खजिनदार | ९८६०९००५०१ |
| श्री. सतिश कृष्णाजी विरकर | सहखजिनदार | ९४२११३४२८३ |
| ॲड. विवेक काशिनाथ रेळेकर | सदस्य | ९८२२१५८९३२ |
| डॉ. मिलिंद गिरीश गोखले | सदस्य | ९४२२०५३४९२ |
| श्री. प्रकाश रामचंद्र पाथरे | सदस्य | ९४२३२९४३८६ |
| श्री. अंबरीश अनंत खातू | सदस्य | ९४२३८५८५८५ |

## उपक्रम

★ बाई रतन बाई घरडा अंध पुर्नवसन केंद्र चिपळूण अंतर्गत
अंधाचे शैक्षणिक, व्यावसायिक व आर्थिक पुर्नवसन

★ नॅब आय हॉस्पिटल, चिपळूण

## नेत्ररोग तज्ञ

★ **रूग्णालयातील निवासी नेत्ररोग तज्ञ :**
डॉ. राहुल बंडगर, डॉ. हितेश मेहेर, डॉ. इंद्रनिल मुळीक, डॉ. प्रतिक सुरूशे, डॉ. तुषार शेवाळे.

★ **व्हिजिटींग नेत्र रोग विशेषतज्ञ :**
डॉ. योगेश राजगुरू, डॉ. अनघा राजगुरु (कान, नाक, व  घसा तज्ज्ञ),
डॉ. अक्षय अरगाडे (नेत्रपटल तज्ज्ञ),
डॉ. अमित खेडेकर (डोळ्याची खोबणी, नेत्र प्लास्टिक शस्त्रक्रिया आणि नेत्र कर्करोग व
तिरळेपणा विशेष तज्ञ)

# राष्ट्रीय अंध कल्याण संघ (नॅब) चिपळूण जिल्हा शाखा रत्नागिरी

**नोंदणी क्र. एफ / १२६५ / रत्नागिरी**

## वार्षिक सर्वसाधारण सभा २०२२-२३

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची सन २०२२-२३ ची **वार्षिक सर्व साधारण सभा रविवार दि. १८ जून २०२३ रोजी सकाळी १०.०० वा. ''नॅब कार्यालय'' चिपळूण** येथे खालील कामांचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती.

सभेपुढील विषय :-

१. मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजुर करणे.

२. माहे एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ पर्यंतच्या लेखापरिक्षण अहवालाचे वाचन करणे व मंजूरी घेणे.

३. बाई रतन बाई घरडा अंध पुनर्वसन केंद्र व नॅब आय हॉस्पिटलच्या माहे एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ अखेर अहवालाचे वाचन करणे.

४. सन २०२३-२०२४ या कालावधीचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

५. मा. धर्मादाय आयुक्त यांच्या कडील कामाची माहिती घेणे.

६. मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्यावेळी येणा-या कामाचा विचार करणे.

कार्यवाह
राष्ट्रीय अंध कल्याण संघ (नॅब) चिपळूण
जिल्हा शाखा रत्नागिरी

टिप :-

१. सभेसाठी आवश्यक गणपूर्ती न झाल्यास सभेचे कामकाज अर्धा तास तहकूब ठेवून सभा अर्ध्यातासानंतर त्याच ठिकाणी घेण्यात येईल. त्यास गणपूर्तीची अट असणार नाही.

२. सभेच्या वेळी सभासदांना काही माहिती हवी असल्यास किंवा सभेपुढे सुचना मांडावयाच्या असतील तर लेखी स्वरूपात दिनांक १३ जून २०२३ पूर्वी कार्यालयात पोहचतील अशा पाठवाव्यात. त्यानंतर आलेल्या पत्रांचा वार्षिक सभेमध्ये विचार करता येणार नाही.

# संचालक अहवाल

**नॅब आय हॉस्पिटल चिपळूण**

**आपले रूग्णालयामार्फत होणारे नेत्रशिबीरे, नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया यांचा तपशिल**

| | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ | २०२२-२०२३ |
|---|---|---|---|
| नेत्रशिबीर संख्या | ३४ | ४८ | ९४ |
| | एकूण | एकूण | एकूण |
| बाह्य रूग्ण संख्या | १७४१८ | २०९४६ | २९६५३ |
| शस्त्रक्रिया | | | |
| मोफत शस्त्रक्रिया | ९१५ | १२७४ | २२०३ |
| आय.पी.एफ. शस्त्रक्रिया | १८७ | १९२ | ३१२ |
| शुल्क शस्त्रक्रिया | १३१४ | १२४८ | १७०२ |
| इतर शस्त्रक्रिया | ७८ | ३२ | १२७ |
| फेको शस्त्रक्रिया | ४३१ | ४९७ | ६२३ |
| एकूण शस्त्रक्रिया | २९२५ | ३२४३ | ४९६७ |

## अहवाल वर्षात आलेली नवीन उपकरणे

१. सेंच्युरिऑन सिल्व्हर फेको मशिन

## आपले इतर उपक्रम आणि त्याची माहिती खालीलप्रमाणे

**कोविड १९ च्या महासाथीच्या प्रादुर्भावामुळे आपले वार्षिक कार्यक्रम आयोजीत करता आले नाहीत.**

- दि. ०६ मे २०२२ रोजी शृंगारतळी ता. गुहागर येथे एस.टी. स्टॅण्ड शेजारी ''दृष्टी आय केअर सेंटर'' यांच्या सहकार्याने नॅब आय हॉस्पिटल चिपळूण तर्फे बाह्यरूग्ण तपासणी कक्षाचे उद्‌घाटन करण्यात आले. याप्रसंगी व्यापारी मंडळाचे अध्यक्ष श्री. मोहन संसारे, नॅब संचालक श्री. प्रकाश पाथरे, प्रशासकिय अधिकारी श्री. भरत नांदगावकर व संदीप नलावडे उपस्थित होते.

- दि. ०६ जून २०२२ रोजी १००% दृष्टीबाधित कु. सुरज उदय झगडे रा. गांधळे, ता. चिपळूण यांना नॅब प्रशिक्षण केंद्र मुंबई येथे प्रशिक्षणाकरिता प्रवेश घेऊन देण्यात आला.

- दि. २५ जून २०२२ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील दृष्टीबाधित कु. यश देवरुखकर रा. साखरपा, कु. राजेश पार्वते रा. भडखंबा ता. रत्नागिरी, कु. वाहीम कडवईकर रा. कडवई ता. संगमेश्वर या तिघांना सत्यम नॅब वर्कशॉप फॉर दि ब्लाईंड प्रभादेवी मुंबई येथे प्रशिक्षण करिता प्रवेश घेऊन देण्यात आला.

- दि. १९ ऑगष्ट २०२२ रोजी १००% दृष्टीबाधित सुनंदा मेस्त्री रा. अजिवली, ता. राजापूर आणि प्रगती तावडे, रा. विल्ये, ता. राजापूर यांना पुनवर्सन अंतर्गत संस्थेतर्फे दुकानामध्ये फ्रिज देण्यात आला.

- दि. १० ऑक्टोबर २०२२ रोजी १००% दृष्टीबाधित श्री. रविंद्र कांबळी रा. धामणदेवी, ता. खेड यांना संस्थेतर्फे घरकुल करिता रु.५०,०००/- आर्थिक मदत करण्यात आला.
- दि. १५ ऑक्टोबर २०२२ रोजी जागतिक अंध सहाय्यता दिन साजरा करण्यात आला यावेळी पोलिस निरीक्षक श्री. रविंद्र शिंदे व संस्थेचे संचालक तसेच दृष्टीबाधित बांधव उपस्थित होते.
- दि. २७ ऑक्टोबर २०२२ रोजी दृष्टीबाधित कु. मोहन शुक्ला यांस नॅब आय. डी. बी. आय. पॉलिटेक्नीक कॉलेज अंबरनाथ येथे प्रवेश देण्यात आला.
- दि. १३ नोव्हेंबर २०२२ रोजी दृष्टीबाधित श्री. राकेश चाळके यांना संस्थेच्या माध्यमातून श्री स्वामी समर्थ पंचकर्म सेंटर लोटे या नावे मसाज सेंटरचे उद्घाटन नॅबचे अध्यक्ष श्री सुचय रेडीज, कार्यवाह श्री निलेश भुरण, सदस्य श्री प्रकाश पाथरे यांच्या हस्ते करण्यात आले.
- दि. १८ नोव्हेंबर २०२२ रोजी शैक्षणिक मदत अंतर्गत १० दृष्टीबाधितांना डी.व्ही.डी. प्लेअर देण्यात आले.
- दि. ११ डिसेंबर २०२२ व दि. १२ डिसेंबर २०२२ रोजी स्वयंसिध्दता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेचे मार्गदर्शक श्री. स्वागत थोरात व सौ. स्वरूपा देशपांडे हे होते. सदर कार्यशाळेचा लाभ ४५ दृष्टीबाधितांनी घेतला.
- दि. ०५ ते ०९ जानेवारी २०२३ रोजी नॅब गोवा यांच्या तर्फे आयोजित करण्यात आलेल्या पर्पल फेस्टीवल करिता रत्नागिरी जिल्ह्यातील १७ दृष्टीबाधितांनी सहभाग घेतला.
- दि. १२ जानेवारी २०२३ रोजी शासनाच्या सडक सुरक्षा सप्ताह मध्ये बहादुरशेख नाका चिपळूण येथे पोलिस व इतरांकरिता नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करून नेत्र तपासणी करण्यात आली.
- दि. ४ जानेवारी २०२३ व दि. ०५ जानेवारी २०२३ रोजी नॅब चिपळूणच्या सहाय्याने स्नेह ज्याती अंध विद्यालय घराडी येथील दृष्टीबाधित विद्यार्थ्यांसाठी स्वयंसिध्दता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेचा लाभ १५ विद्यार्थ्यांनी घेतला.
- दि. २५ मार्च २०२३ रोजी नॅब युनिट महाराष्ट्र नाशिक यांजकडून आदर्श शिक्षक पुरस्कार २०२३ हा. जि.प. प्राथमिक शाळा गिमवी ता. गुहागर येथील दृष्टीबाधित नॅब चिपळूणचे सभासद श्री. दशरथ कदम यांना प्रदान करण्यात आला. तसेच गुणवंत विद्यार्थी २०२३ करिता रत्नागिरी जिल्ह्यातील दृष्टीबाधित कु. वहिब कडवईकर १२ वी व सर्वेश पवार १० वी यांचा गौरव करण्यात आला.
- अहवाल वर्षातील दृष्टीबाधितांचे विवाह प्रसंगी गृहपयोगी वस्तू नॅब चिपळूण तर्फे देण्यात आल्या.
  दि. ०७ जून २०२२ कु. निकीता लोंढे रा. कांगवई, ता. दापोली
  दि. ०२ जुलै २०२२ कु. प्रगती प्रभात तावडे रा. विल्ये, ता. राजापूर
  दि. १४ डिसेंबर २०२२ कु. अजय गवतडे, रा. धामापूर, ता. संगमेश्वर

# कार्यकारिणी सदस्य सभा उपस्थिती

| नाव | वार्षिक सर्वसाधारण सभा | कार्यकारिणी सभा |
|---|---|---|
| एकूण सभा | १ | ८ |
| श्री. सुचय नथुराम रेडीज | १ | ८ |
| श्री. इब्राहीम अहमद दलवाई | १ | ५ |
| सौ. सुचेता नारायण लाड | १ | ३ |
| श्री. निलेश आत्माराम भुरण | १ | ६ |
| श्री. सलिम कासिम पालोजी | १ | ४ |
| श्री. नयन मनोहर साडविलकर | १ | ६ |
| श्री. सतिश कृष्णाजी विरकर | १ | ८ |
| ॲड. विवेक काशिनाथ रेळेकर | १ | ३ |
| डॉ. मिलींद गिरीश गोखले | १ | ७ |
| श्री. प्रकाश रामचंद्र पाथरे | १ | ७ |
| श्री. अंबरीश अनंत खातू | १ | ६ |

# *नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड (नॅब) चिपळूण जिल्हा शाखा रत्नागिरी.*

**नॅब संस्थेचे उपक्रम**

१. अंधाना नोकरी, पुनर्वसन व रोजगार - स्वयंरोजगार मार्गदर्शन व मदत
२. अंधाना शिक्षण, प्रशिक्षण व शैक्षणिक मदत, अंध मेळावा
३. अंधत्व निवारण (नेत्र चिकित्सा शिबीरे, रूग्ण तपासणी व शस्त्रक्रिया)

| क्र. | उपक्रम (दि. ०१ एप्रिल २०१० पासून) | सन २०२२-२३ | लाभार्थी |
|---|---|---|---|
| १ | व्यवसाय पुनर्वसन प्रशिक्षण | ५ | ६२ |
| २ | स्वयंरोजगार | ४ | ४० |
| ३ | शिक्षण व अंधाचे पाल्यास शैक्षणिक मदत | ७७ | २५७७ |
| ४ | अंध मेळावा | - | ६ |
| ५ | बाई रतन बाई घरडा पुरस्कार | - | ७ |

**अंधत्व निवारण उपक्रम (प्रकल्प : नॅब आय हॉस्पिटल)**

| अ. क्र. | सन | नेत्र शिबीरे | रुग्ण तपासणी | | शस्त्रक्रिया | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शिबीरे | हॉस्पिटल | साधे | भिंगारोपन (आय.ओ.एल.) | इतर | |
| १ | १९९५-२००० | २१६ | १२४९४ | ४५६९ | ३८६ | ४८८ | ८ | ८८२ |
| २ | २०००-२००५ | ४४७ | ४०९१५ | ४५१५३ | १२७ | ५१२७ | १११ | ५३६५ |
| ३ | २००५-०६ | ७९ | ५९१८ | ११३५८ | ३१ | २३२५ | ३३ | २३८९ |
| ४ | २००६-०७ | ९८ | १०३२७ | १०९२६ | ३१ | २८५७ | २६ | ८९१४ |
| ५ | २००७-०८ | ८२ | १११२३ | ११३६८ | ७ | २५०९ | ३७ | २५५३ |
| ६ | २००८-०९ | ९३ | ६९९५ | १३०६२ | १० | २४३५ | ३६ | २४८१ |
| ७ | २००९-२०१० | ९२ | ६०१७ | १३९९८ | १३ | २५२८ | २१ | २५६२ |
| ८ | २०१०-२०११ | ९० | १७५७ | १३३२१ | ११ | २९०२ | १६ | २९२९ |
| ९ | २०११-२०१२ | ८७ | १६४७ | १३५७५ | १४ | २७९१ | ५ | २८१० |
| १० | २०१२-२०१३ | ७६ | १४६२ | १४९७१ | २ | २९२१ | ५ | २९२८ |
| ११ | २०१३-२०१४ | ८६ | १८९० | १६३८० | ७ | ३५५१ | ३४ | ३५९२ |
| १२ | २०१४-२०१५ | ८२ | १८३० | १७५५४ | ५ | ३४८५ | ४५ | ३५३५ |
| १३ | २०१५-२०१६ | ८८ | १९६५ | १९८८२ | ० | ३७१८ | ४९ | ३७६७ |
| १४ | २०१६-२०१७ | ७६ | १८४४ | २०४६२ | ० | ३५२५ | २२ | ३५४७ |
| १५ | २०१७-१८ | ८४ | १८८७ | २३६१३ | ० | ३७७५ | ७१ | ३८४६ |
| १६ | २०१८-१९ | ७७ | १६२३ | २४६५६ | ० | ३५२२ | ९७ | ३६१९ |
| १७ | २०१९-२० | ७५ | १५७९ | २२६५८ | ० | २८३२ | ११३ | २९४५ |
| १८ | २०२०-२१ | ३४ | ६१५ | १६७९६ | ० | २७९४ | १३१ | २९२५ |
| १९ | २०२१-२२ | ४८ | १६३० | १९३१६ | ० | ३११४ | १३४ | ३२४८ |
| २० | २०२२-२३ | ९४ | २८२८ | २६८२५ | ० | ४८१५ | १५२ | ४९६७ |
| **एकूण** | | **२१०४** | **११६३४६** | **३६०४४३** | **६४४** | **६२०१४** | **११४६** | **६३८०४** |

# संचालक मंडळ

## सन २०२० - २०२५



श्री. सुचयशेठ रेडीज
अध्यक्ष



श्री. इब्राहीम दलवाई
उपाध्यक्ष



सौ. सुचेता लाड
उपाध्यक्षा



श्री. निलेश भुरण
कार्यवाह



श्री. सलीम पालोजी
सहकार्यवाह



श्री. नयन साडविलकर
खजिनदार



श्री. सतीश कृष्णाजी विरकर
सहखजिनदार



ॲड. विवेक रेळेकर
संचालक



श्री. डॉ. मिलींद गोखले
संचालक



श्री. प्रकाश पाथरे
संचालक



श्री. अंबरीश खातू
संचालक




शृंगारतळी ता. गुहागर येथे ''दृष्टी आय केअर सेंटर'' यांच्या सहकार्याने नॅब आय हॉस्पिटल चिपळूण तर्फे बाह्यरुग्ण तपासणी कक्षाचे उद्घाटन प्रसंगी व्यापारी मंडळाचे अध्यक्ष श्री. मोहन संसारे, नॅब संचालक श्री. प्रकाश पाथरे, प्रशासकीय अधिकारी श्री.भरत नांदगावकर व श्री. संदिप नलावडे



दिनांक १५ ऑक्टोबर २०२२ रोजी जागतिक अंध सहायता दिन साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित पोलिस निरीक्षक श्री. रविंद्र शिंदे, संस्थेचे संचालक श्री. सुचय रेडीज, श्री. इब्राहिम दलवाई, श्री. निलेश भुरण, श्री. प्रकाश पाथरे, श्री. अंबरीश खातू, सौ. सुचेता लाड




पर्पल फेस्टीवल गोवा मध्ये सहभागी रत्नागिरी जिल्ह्यातील दृष्टीबाधित.



# चला पुढे.... प्रकाशाकडे

प्रकाशक : श्री. निलेश भुरण, कार्यवाह, नॅब चिपळूण. जिल्हा शाखा रत्नागिरी
(फक्त खाजगी वितरणासाठी)

Printed by : PRATHAM PRINTERS, CPN. 9422409432